# ‘बुकगंगा’ने काढली लाख प्रतींची आवृत्ती

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

छापील पुस्तकांकडून ई-बुककडे जाण्याचा प्रवाह साहित्यविश्वामध्ये निर्माण झाला असताना ई-बुक व ऑनलाइन साहित्यासाठी प्रसिद्ध असलेल्या बुकगंगाने मात्र वेगळी वाट चोखाळत छापील पुस्तक प्रसिद्ध केले आहे. एवढ्यावरच न थांबता एक लाख प्रतींची प्रथम आवृत्ती काढून बुकगंगाने मराठी प्रकाशन विश्वात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

‘बुके नको बुक द्या’, या विचारातून बुकगंगाने प्रत्यक्ष पुस्तक निर्मिती केली आहे. ‘बी पॉझिटिव्ह- सकारात्मक विचार प्रवास पूर्णत्वाकडे’ असे या पुस्तकाचे नाव असून, मराठी व इंग्रजीमधील सुविचारांचे हे पुस्तक आहे. या पुस्तकाची प्रथम आवृत्ती एक लाख प्रतींची काढण्यात आली आहे, अशी माहिती बुकगंगाच्या संचालिका सुप्रिया लिमये यांनी ‘मटा’ला दिली. मराठीत एक लाख प्रतींची आवृत्ती प्रथमच निघाली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

ई-बुकविषयी जागृती वाढत आहे. मात्र छापील पुस्तकाचीही निर्मिती असावी, या विचारातून हे पुस्तक काढण्यात आल्याचे लिमये यांनी सांगितले. ई-बुक आणि पुस्तक यांची तुलना होऊ शकत नाही. प्रकाशक आणि वाचक दोघांच्याही दृष्टीने ई-बुक अधिक सोयीचे आहे. स्मार्टफोन ॲप्लिकेशन, ई-बुक ही बदलत्या काळाची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले. पिंपरीमध्ये झालेल्या साहित्य संमेलनापासून या पुस्तकावर वाचकांच्या उड्या पडू लागल्या आहेत. तसेच ई-बुकचा मर्यादित व्यवहार संमेलनामुळे वाढला आहे, अशी माहिती लिमये यांनी दिली.

**ई-बुकबरोबर छापील आवृत्तीही**

> **गेल्या काही वर्षांत ई-बुक निर्मिती मोठ्या प्रमाणात केली जाऊ लागली आहे. मात्र, मराठी साहित्य व्यवहारात ई-बुकचा व्यवहार अद्यापही मर्यादित स्वरूपातच आहे. काही मोजकेच प्रकाशक मुद्रित पुस्तकांसह ई-बुकचीही निर्मिती करतात. तसेच ई-बुक उपलब्ध असलेल्या वेबसाइटची संख्याही मर्यादित आहे. मेहता पब्लिशिंग हाउस, डेलिहंट, बुकगंगा डॉट कॉम अशा मोजक्याच ठिकाणी मराठी ई-बुक उपलब्ध आहे. ई-बुक म्हणजे पीडीएफ हाच अनेकांचा समज आहे. मात्र, ई-बुक ही पूर्णतः वेगळी संकल्पना आहे.**
>
> **- सुप्रिया लिमये,**
> संचालिका, बुकगंगा